# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एनजीपी/छाननी/२००९/ ८५१
दिनांक : 2 3 दिसम्बर 2009

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद /
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून अभियांत्रिकी / हॉटेल मॅनेजमेंट पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यासाठी सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रेझेंटेशन / छाननी समितीची बैठक.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते कीं, शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून अभियांत्रिकी / हॉटेल मॅनेजमेंट पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी, प्रझेंटेशन / छाननी समितीची बैठक **दिनांक ०५.०१.२०१० ते ०८.०१.२०१०** या कालावधीत या संचालनालयात आयोजित करण्यांत आलेली आहे. छाननी / सुनावणीसाठी बोलविण्यांत येणाऱ्या संस्थांचे विभागनिहाय वेळापत्रक सोबत जोडण्यांत आलेले आहे. तरी आपल्या विभागातील वरील विषयाबाबत प्रस्ताव सादर केलेल्या सर्व संस्थांना सुनावणीचा दिनांक व वेळ कळविण्यांत येऊन छाननी / सुनावणीस मूळ कागदपत्रासह उपस्थित राहण्याबाबत सूचना आपल्या स्तरावरुन देण्यांत याव्यात.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

[P.T.O.]

**दिनांक ०५.०१.२०१० ते ०८.०१.२०१० या कालावधी संचालनालय स्तरावर आयोजित करण्यांत आलेल्या छाननी / सुनावणीसाठी बोलविण्यांत येणाऱ्या संस्थांचे विभागनिहाय वेळापत्रक**

| अ.क्र. | विभागाचे नांव | सुनावणीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | मुंबई | दिनांक ०५.०१.२०१० सकाळी १०.३० (सर्व संस्था) |
| २. | अमरावती | दिनांक ०५.०१.२०१० दुपारी २.०० (सर्व संस्था) |
| ३. | पुणे | दिनांक ०६.०१.२०१० सकाळी १०.३० (१ ते २०)<br>दिनांक ०६.०१.२०१० सकाळी २.०० (२१ ते पुढील सर्व) |
| ४. | नाशिक | दिनांक ०७.०१.२०१० सकाळी १०.३० (१ ते २०)<br>दिनांक ०७.०१.२०१० सकाळी २.०० (२१ ते पुढील सर्व) |
| ५. | औरंगाबाद | दिनांक ०८.०१.२०१० दुपारी २.०० (सर्व संस्था) |
| ६. | नागपूर | दिनांक ०८.०१.२०१० सकाळी १०.३० (सर्व संस्था) |

आपल्या विभागातील प्रस्ताव सादर केलेल्या सर्व संस्थांना प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील कागदपत्रांच्या मूळ कागदपत्रे सुनावणीच्या वेळी सोबत आणण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात.

१. ट्रस्ट नोंदणीबाबतचे मूळ कागदपत्रे.
२. जमीन संस्थेच्या नावावर असल्याचा ७/१२ उताऱ्याची मूळ प्रत.
३. जमीनीचे बिगरशेती प्रमाणपत्र.
४. जमीन वापराबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.
५. इमारतीचा नोंदणीकृत आर्किटेक्टने तयार केलेला आराखडा व त्यास सक्षम अधिकाऱ्याने मंजूरी दिल्याबाबतची कागदपत्रे.
६. इमारत बांधकामाचे सद्यस्थितीबाबतचे रंगीत फोटो.
७. प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेले बांधकामाच्या सद्यस्थितीबाबत नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र.
८. संस्थेच्या आर्थिक स्थितीबाबत संस्थेकडे उपलब्ध असलेल्या मुदतठेवी / बँकेतील दिनांक ३१.१२.२००९ अखेर शिल्लक रकमेचे प्रमाणपत्र.